महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई
समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३ ,चर्च पथ,पुणे-४११००१

सकआ/आस्था/प्र-२/पदभरती/जाहिरात/२०२४/३७४३ दिनांक ७.१०.२०२४.

# जाहिरात

समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवरील वर्ग -३ संवर्गातील वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक, गृहपाल / अधिक्षक (महिला), गृहपाल / अधिक्षक (सर्वसाधारण), समाज कल्याण निरिक्षक, उच्चश्रेणी लघुलेखक,निम्न श्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या संवर्गातील खालील तक्त्यात नमुद केलेली रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता / पात्रता धारण करीत असलेल्या पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पद :-वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक** (Senior Social Welfare Inspector) **(एकूण पदे-५)**

| रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि. मा.प्र | इ. मा.व | आ दुघ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
| | पद संख्या | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ४ | १ | ५ |
| रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ४ | १ | ५ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | दिव्यांग | ० | | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | ० | | | | | | | | | | | | |

**पद :- समाज कल्याण निरीक्षक** (Social Welfare Inspector) **(एकूण पदे ३९)**

| रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा. प्र | इ.मा व | आ.दु. घ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
| | पद संख्या | ३ | ३ | ० | २ | २ | ३ | २ | ५ | ४ | २ | २६ | १३ | ३९ |
| रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | २ | २ | ० | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १३ | ४ | १७ |
| २ | महिला | १ | १ | ० | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | १० | ४ | १४ |
| ३ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ | २ | ४ |
| ५ | अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | २ |
| ६ | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ८ | दिव्यांग | एकूण २ पदे | | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | ० | | | | | | | | | | | | |

## पद :- गृहपाल / अधिक्षक (Warden) (महिला) (एकूण ९२ पदे)

| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि जा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि. मा. प्र | इ.मा. व | आ.दु. घ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | |
| | पद संख्या | ०८ | ०६ | ०२ | ०१ | ०३ | ०१ | ०२ | १७ | ०९ | ०९ | ५८ | ३४ | ९२ |
| | रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | ०६ | ०४ | ०२ | ०१ | ०३ | ०१ | ०२ | १० | ०७ | ०७ | ४३ | २१ | ६४ |
| २ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ०१ | २ | ०३ |
| ३ | माजी सैनिक | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ०३ | ०१ | ०१ | ०७ | ०५ | १२ |
| ४ | अंशकालीन | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ०२ | ०१ | ०१ | ०६ | ०३ | ०९ |
| ५ | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ |
| ६ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ०१ | ०२ | ०३ |
| ७ | दिव्यांग | एकूण ४ पदे | | | | | | | | | | | | |
| ८ | अनाथ | एकूण १ पदे | | | | | | | | | | | | |

## पद :- गृहपाल / अधिक्षक (Warden) (सर्वसाधारण) (एकूण ६१ पदे)

| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि. मा. प्र | इ.मा. व | आ.दु.घ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | |
| | पद संख्या | ५ | ५ | १ | १ | २ | ० | १ | ११ | ६ | ६ | ३८ | २३ | ६१ |
| | रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | ० | १ | ३ | २ | २ | १३ | ९ | २२ |
| २ | महिला | २ | २ | ० | ० | १ | ० | ० | ३ | २ | २ | १२ | ७ | १९ |
| ३ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ०१ | १ | २ |
| ४ | माजी सैनिक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ६ | ३ | ९ |
| ५ | अंशकालीन | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ५ | २ | ७ |
| ६ | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | २ |
| ८ | दिव्यांग | एकूण २ पदे | | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | एकूण १ पदे | | | | | | | | | | | | |

## पद :- उच्चश्रेणी लघुलेखक (Higher Grade Steno) (एकूण पदे १०)

| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ.ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि. मा. प्र | इ.मा. व | आ.दु. घ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | |
| | पद संख्या | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | ७ | ३ | १० |
| | रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्व साधारण | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | १ | १ | ६ | २ | ८ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | २ |
| ३ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंश कालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | दिव्यांग | ० | | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | ० | | | | | | | | | | | | |

## पद :- निम्नश्रेणी लघुलेखक (Lower Grade Steno) (एकूण पदे ३)

| रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा. प्र | इ.मा. व | आ.दु. घ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
| | पद संख्या | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ३ | ० | ३ |
| रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ३ | ० | ३ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | दिव्यांग | ० | | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | ० | | | | | | | | | | | | |

## लघुटंलेखक (Steno Typist) (एकूण पदे ९)

| रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा. प्र | इ.मा . व | आ.दु. घ | सा. शै. मा. प्र | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
| | पद संख्या | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | २ | २ | ० | ७ | २ | ९ |
| रिक्त पदांचे समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | १ | १ | ० | ५ | १ | ६ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ | १ | ३ |
| ३ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | दिव्यांग | ० | | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | ० | | | | | | | | | | | | |

### १. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

१) जाहिरातीत नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२) पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतचा तपशील वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल,संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/ सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

३) प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला,खेळाडू,माजीसैनिक,दिव्यांग व्यक्ती,अनाथ) उपलब्ध नाहीत.तथापि,जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच जाहिरातीत नमूद नसलेल्या मागासप्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

४) महिला,खेळाडू,माजी सैनिक,दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

५) महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन-क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

६) विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती(ब),भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गांसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

७) एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतांनाच उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

८) समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०१२/ प्र.क्र.१६/१२/१६-अ. दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ. दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

९) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक- राआधी-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ. दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१०) अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) सेवा प्रवेशांच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादे मध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणे बाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२) अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषा संदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक राहील.

१३) कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे.सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

१४) कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

१५) सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

## २. खेळाडू आरक्षण :-

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२.दिनांक १ जुलै २०१६ शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्रमांक राक्रीधो-२००२/ प्र.क्र. ६८/क्रीयुसे- २, दिनांक १८ ऑगस्ट २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो २००२ / प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२.दिनांक ११ मार्च २०१९ व शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक २४ ऑक्टोबर २०१९ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडूंना आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२) प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३) खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडू साठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा करीता पात्र समजण्यात येणार नाही.

४) खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्यासच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

५) एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

## ३. अनाथ आरक्षण:-

१) अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय,महिला व बालविकास विभाग,क्रमांक अनाथ-२०१८ /प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट,२०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळो वेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

२) अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

३) अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांचेकडे सद्यस्थितीत उपलब्ध असलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र

व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

४. माजी सैनिकांकरीता आरक्षण:-

१) उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

२) माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

३) आवश्यक प्रमाणपत्र:-

(१) सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र :-

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण:-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २० जानेवारी, १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करण्याऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबत शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

६. भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण:-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक - भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असले बाबतचे शासकीय नोकरी मिळणे साठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करण्याऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबत शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

७. पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षण :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,क्रमांक-पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठीचे आरक्षण राहील.

८. **वेतनश्रेणी :-**

| अ.क्र | पदाचे नाव | वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर |
|---|---|---|
| १ | उच्चश्रेणी लघुलेखक | S -१६:४४९००-१४२४०० |
| २ | गृहपाल / अधिक्षक (महिला) | S-१४ : ३८६००-१२२८०० |
| ३ | गृहपाल / अधिक्षक (सर्वसाधारण) | S-१४ : ३८६००-१२२८०० |
| ४ | वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | S-१४ : ३८६००-१२२८०० |
| ५ | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१५ : ४१८००-१३२३०० |
| ६ | समाज कल्याण निरीक्षक | S-१३ : ३५४००-११२४०० |
| ७ | लघुटंकलेखक | S-८: २५५००-८११०० |

९. **वयोमर्यादा** (वयोमर्यादा गणण्याचा दिनांक दि.३१.१०.२०२४)

| संवर्ग | वय | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान अमागस / मागसवर्गीय / अनाथ / आ.दु.घ | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडु | | माजी सौनिक | | प्रकल्प ग्रस्त / भुकंप ग्रस्त | अंश कालीन कर्मचारी | दिव्यांग उमेदवार |
| | | अ मागस | मागस वर्गीय / अनाथ आ.दु.घ | अ मागस | मागस वर्गीय / अनाथ आ.दु.घ | अ मागस | मागस वर्गीय / आ.दु.घ | | | |
| उच्चश्रेणी लघुलेखक | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |
| गृहपाल / अधिक्षक (सर्वसाधारण) | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |
| गृहपाल / अधिक्षक (महिला) | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |
| वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |
| निम्नश्रेणी लघुलेखक | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |
| समाज कल्याण निरीक्षक | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |
| लघुटंक लेखक | १८ वर्ष | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी +३ वर्ष | ४३+सेवा कालावधी + ३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |

विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

१०. **शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | गृहपाल / अधिक्षक (सर्वसाधारण) / गृहपाल / अधिक्षक (महिला) | अ) शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणुन मान्य केलेली अर्हता (शारीरिक शिक्षण विषयातील शासनमान्य पदवी असलयास प्राधान्य)<br>ब) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची एम.एस.सी.आय.टी संगणक अर्हता परीक्षा किंवा समकक्ष संगणक अर्हता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | अ) शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणुन मान्य केलेली अर्हता (शारीरिक शिक्षण विषयातील शासनमान्य पदवी असलयास प्राधान्य)<br>ब) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची एम.एस.सी.आय.टी संगणक अर्हता परीक्षा किंवा समकक्ष संगणक अर्हता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ३ | समाज कल्याण निरीक्षक | अ) शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणुन मान्य केलेली अर्हता<br>ब) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची एम.एस.सी.आय.टी संगणक अर्हता परीक्षा किंवा समकक्ष संगणक अर्हता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ४ | उच्चश्रेणी लघुलेखक | अ) शासनमान्य माध्यामिक शालांत परीक्षा बोर्डाची (S.S.C) परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम.<br>ब) १. उच्चश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) -शासनमान्य वाणिज्य प्रमाणपत्र मंडळाची १२० शब्द प्रति मिनिट इंग्रजी लघुलेखन परिक्षा उत्तीर्ण, किंवा<br>२. उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) -शासनमान्य वाणिज्य प्रमाणपत्र मंडळाची १२० शब्द प्रति मिनिट इंग्रजी लघुलेखन परिक्षा उत्तीर्ण.<br>वरील “ब” मधील १ व २ करीता (इंग्रजी व मराठी दोन्ही लघुलेखन १२० शब्द प्रति मिनिट असल्यास प्राधान्य)<br>क) टंकलेखन (इंग्रजी) ४० शब्द प्रतिमिनिट किंवा<br>ड) टंकलेखन (मराठी) ३० शब्द प्रतिमिनिट<br>इ) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची एम.एस.सी.आय.टी संगणक अर्हता परीक्षा किंवा समकक्ष संगणक अर्हता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ५ | निम्नश्रेणी लघुलेखक | अ) शासनमान्य माध्यामिक शालांत परीक्षा बोर्डाची (S.S.C) परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम.<br>ब) १. निम्नश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) -शासनमान्य वाणिज्य प्रमाणपत्र मंडळाची १०० शब्द प्रति मिनिट इंग्रजी लघुलेखन परिक्षा उत्तीर्ण, किंवा<br>२. उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) -शासनमान्य वाणिज्य प्रमाणपत्र मंडळाची १०० शब्द प्रति मिनिट इंग्रजी लघुलेखन परिक्षा उत्तीर्ण.<br>वरील “ब” मधील १ व २ करीता (इंग्रजी व मराठी दोन्ही लघुलेखन १०० शब्द प्रति मिनिट असल्यास प्राधान्य)<br>क) टंकलेखन (इंग्रजी) ४० शब्द प्रतिमिनिट किंवा<br>ड) टंकलेखन (मराठी) ३० शब्द प्रतिमिनिट<br>इ) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची एम.एस.सी.आय.टी संगणक अर्हता परीक्षा किंवा समकक्ष संगणक अर्हता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ६ | लघुटंकलेखक | अ. शासनमान्य माध्यामिक शालांत परीक्षा बोर्डाची (S.S.C) परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम.<br>२. लघुलेखनाचा वेग किमान ८० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असले पाहीजे. (महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद किंवा औदयोगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडील प्रमाणपत्र) |

११. <u>अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक:-</u>

१) अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

२) शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची विहित टंकलेखन अर्हता सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक आहे.

१२. <u>दिव्यांग आरक्षण :-</u>

१) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६ अ. दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२) प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या पदांच्या बाबतीत खालीलप्रमाणे संबंधित संवर्गाची पदे दिव्यांगाकरीता सुनिश्चित करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | शासन निर्णय | दिव्यांगत्वाचा उपप्रकार |
|---|---|---|---|
| १ | गृहपाल / अधिक्षक (महिला / सर्वसाधारण) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.सकआ-२०२०/ प्र.क्र.२०८ / आस्था-२ दि.२४. ०२.२०२१ | a) LV |
| | | | b) BA |
| | | | c) D, HH |
| | | | d) OA,OL, OAL, BL, BLA, BLOA, OAL, LC, DW, AAV |
| | | | e) SLD,MI |
| | | | f)MD,inviolving (a) to (e) above |
| २ | समाज कल्याण निरीक्षक | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.सकआ-२०२०/ प्र.क्र.२०८ / आस्था-२ दि.२४. ०२.२०२१ | a) B,LV |
| | | | b) BA |
| | | | c) D,HH |
| | | | d) OA, OL, OAL, LC, DW, AAV |
| | | | e) MI |
| | | | f) MD,inviolving (a) to (e) above |

३) दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४) दिव्यांग व्यक्तीची पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

५) दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

६) संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**७) लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतीच्या दाव्यास पात्र असतील**

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती

(२) दिव्यांगाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती.

८) दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८ / प्र.क्र.४६/आरोग्य-६. दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीव्दारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

९) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.दिव्यांग २०११/प्र.क्र२००/दि.क.२ दि.०५ ऑक्टोंबर २०२१ अन्वये विहित केल्यानुसार लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी यांना स्पर्धा परीक्षेस बसताना लेखनाची अडचण तसेच लेखनाची गती कमी असल्यास त्यांनी केलेल्या मागणीनुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (आर) नुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या वर्गवारीमधील अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित असलेले किंवा दोन्ही हात नसलेले) असलेल्या दिव्यांग परिक्षार्थींना लेखनिक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात येईल.

१०) लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या इतर प्रकारातील दिव्यांग परिक्षार्थीच्या बाबतीत,संबंधित दिव्यांग व्यक्तीने लेखनिक पुरविणे आवश्यक असल्याचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधीक्षक यांनी प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील (नमुना-१) प्रमाणपत्र भरुन संकेतस्थळावर अपलोड केले नंतर सदर दिव्यांग परिक्षार्थीस गरज व आवश्यकतेनुसार परीक्षा देताना लेखनिक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात येईल.

११) उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व त्याच्या मानधनाची व्यवस्था करावी संबंधित लेखनिकाच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबतची जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखनिक उपस्थित नसल्याच्या कारणास्तव ऐनवेळी लेखनिकाची व्यवस्था समाज कल्याण आयुक्तालय कार्यालयामार्फत कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही.

१२) लेखनिक म्हणून मदत देणारी व्यक्ती एकाच परिक्षेसाठी एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून काम करणार नाही याची दक्षता उमेदवाराने घ्यावी.

१३) उमेदवाराने स्वतः व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल,लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१४) लेखनिकाने स्वतः प्रश्न सोडवू नये अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन वा सूचना करू नयेत. उमेदवाराकडून तोंडी सूचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमूद करणे एवढेच आवश्यक राहील.

१५) अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आवश्यक कागदपत्रे अपलोड न केल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

१६) परीक्षेकरीता लेखनिकाच्या मदतीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी संकेत

स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७) लेखनिकाची मागणी करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी संबंधित उप केंद्रप्रमुख समवेक्षक यांचेकडे सर्व संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणी करता सादर करणे अनिवार्य आहे.

१८) लेखनिकाची आवश्यकता असणा-या दिव्यांग उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना खालील कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे तसेच परीक्षेच्या वेळी खालील कागदपत्रांची मुळ प्रत तपासणी साठी सादर करणे अनिवार्य आहे.

I. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६. दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ अथवा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रवि- २०१८ / सोआर ४६/ आरोग्य ६. दिनांक १४ सप्टेंबर २०१८ नुसार संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यांत आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरूपी किमान ४०% दिव्यांगत्व असलेबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची स्वसाक्षांकीत छायांकित प्रत.

II. दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वतः उत्तरे लिहीण्यासाठी सक्षम नसल्याबाबत विहित प्राधिका-याने प्रमाणित केलेले मूळ प्रमाणपत्र (नमुना क्रमांक १) (Certificate regarding physical Limitation in an examinee to write) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत. लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या वर्गवारीमधील अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित असलेले किंवा दोन्ही हात नसलेले) असलेल्या दिव्यांग उमेदवार वगळून) उमेदवार स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार असल्याने लेखनिकाची शैक्षणिक अर्हता उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक टप्पा कमी असणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवाराने विहित नमुन्यामध्ये वचनपत्र (Letter of Undertaking for Using Own Scribe in PDF format) (नमुना-२) भरुन अपलोड करणे बंधनकारक आहे. (फक्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

III. लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे विहित नमुन्यातील (नमुना क्रमांक ३) संयुक्त प्रमाणपत्र (लेखनिकाच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोसह) (फक्त लेखनिकाची आवश्यकता असणा- या उमेदवारांकरीता लागू)

IV. लेखनिकाचे मूळ आधारकार्ड / पॅनकार्ड/ स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्राइव्हींग लाईसन्स / मतदान ओळखपत्र / पासपोर्ट यापैकी एक (ओळख पडताळणीसाठी) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत (फ़क्त लेखनिकाची आवश्यकता असणा-या उमेदवारांकरीता लागू)

१९) लेखनिकाची मदत घेण्याबाबत विहित निकषांचा उमेदवारांकडून पुर्तता होत नसल्याचे अथवा उमेदवाराने स्वतः बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास स्वेच्छाधिकारानुसार समाज कल्याण आयुक्तालयामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित (Debar) करण्यांत येईल / अथवा इतरही कायदेशीर कारवाई

करण्यांत येईल. अशा प्रकरणी उमेदवाराची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झाली असेल तर त्याची सेवा समाप्ती करण्यास तो पात्र राहील.

२०) लेखनिकाची आवश्यकता असणा-या दिव्यांग उमेदवारांनी किमान ४०% दिव्यांगत्व असले बाबतचे प्रमाणपत्र, नमुना क्रमांक १ (मुद्दा क्र.१ मधील नमुद प्रवर्गातील उमेदवार वगळून अन्य सर्व दिव्यांग उमेदवारास लागू), नमुना २ व ३ भरून हे एकाच PDF स्वरुपामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

२१) अनुग्रह कालावधी -लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या सर्व परिक्षार्थीना लेखनिक वापरण्यास परवानगी देण्यात आली नसली तरी वाढीव कालावधी प्रति तास २० मिनिटे इतका देय असेल.

## १३. सर्वसाधारण :-

(१) अर्ज फक्त ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

(२) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ - https://sjsa.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील बातम्या (News) / महत्वाची संकेतस्थळे (USEFUL LINKS) मध्ये समाज कल्याण पदभरती २०२४ / social welfare recruitment 2024 असे आहे.

(३) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(४) अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(५) अर्ज सादर करण्याचा कालावधी :- दिनांक १०.१०.२०२४ रोजी १७.०० वाजल्यापासून दिनांक ११.११.२०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत राहील.

(६) ऑनलाईन परीक्षेचा दिनांक https://sjsa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल

## १४. परीक्षा शुल्काचा भरणा :- १) परीक्षा शुल्क (फी):

| अ.क्र | प्रवर्ग | आवश्यक परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | रु.१०००/- (अक्षरी रु.एक हजार मात्र) |
| २ | मागास प्रवर्ग | रु.९००/- (अक्षरी रु.नऊशे मात्र) |

२) माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

३) परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

४) शासनाने ज्या प्रवर्गासाठी परीक्षा शुल्कात सवलत दिली आहे त्यांना ती अनुज्ञेय राहील.

५) उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच देय कर अतिरिक्त असतील.

६) उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक आहे.

## १५. निवडीची पध्दत :- खालील पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन गुण ठरविले जातात.

१) वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये प्रत्येक उमेदवाराने अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या अंतिम गुणांसाठी विचारात घेतले जातील.

२) परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेण्यात आलेली असल्यास वरीलप्रमाणे उमेदवाराने संपादित केलेले अंतिम गुण विविध सत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील काठिण्य पातळी विचारात घेऊन विविध सत्रामध्ये गुण समायोजित करुन समतुल्य करण्यात येतील.

३) गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

४) संगणक आधारित (Computer Based Online Examination) परीक्षेसाठी अभ्यासक्रम व इतर तपशिल खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | विषय | प्रश्न संख्या | गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २५ | ५० |
| २ | इंग्रजी | २५ | ५० |
| ३ | सामान्य ज्ञान | २५ | ५० |
| ४ | बौध्दिक चाचणी | २५ | ५० |
| | एकूण | १०० | २०० |

५) जाहिरातीमध्ये नमुद अर्हता/पात्रताविषयक अटी किमान असून अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र ठरणार नाही.

## १६. निवडसूचीची कालमर्यादा :-

निवड समितीने तयार केलेली निवड सुची एक वर्षासाठी विधीग्राहय राहिल. प्रकरणी शासनाचे प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. (सामान्य प्रशासन विभागाकडे शासन निर्णय क्र.प्रनिम-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ,दि.४.५.२०२२)

## १७. परीक्षा केंद्र व परिक्षेबाबतच्या सर्वसाधारण सुचना :-

१) उमेदवारांना नेमून दिलेली परीक्षा केंद्र व त्याचा पत्ता प्रवेश पत्रात नमुद करण्यात येईल.संबंधित परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.

२) उमेदवाराने एकदा केलेली परीक्षा केंद्राची निवड अंतिम असेल. परिक्षेचे केंद्र/ स्थळ/ तारीख/वेळ/सत्र बदलण्याची कोणतीही विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैदयकीय किंवा इतर कारणासाठी) स्विकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

३) कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे किंवा परीक्षा केंद्र वाढविणे याचे अधिकार विभाग स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

४) उमेदवाराला त्याने/तीने निवडलेल्या केंद्रा व्यतिरिक्त कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार विभाग स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

५) उमेदवाराने परिक्षा केंद्रावर स्वत:चे जोखमीवर आणि स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यास कोणतही प्रवास खर्च वा भत्ता दिला जाणार नाही किंवा उमदेवाराच्या कोणत्याही स्वरुपाची इजा किंवा नुकसानीसाठी विभाग जबाबदार राहणार नाही.

६) उमेदवारांनी एखादया विशिष्ठ परिक्षा केंद्राची पुरेशा संख्येने निवड केलेली नसल्यास किंवा एखादया केंद्राची निवड त्या केंद्राच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारानी केलेली असल्यास उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी इतर कोणतेही संलग्न केंद्र वाटप करण्याचा अधिकार विभागास राहील.

७) उमेवारांने भरणा केलेली परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे,अर्ज चुकणे,काही कारणास्तव परिक्षेस बसू न शकणे, इ. अशा कारणासाठी) परत केली जाणार नाही.

## १८. अयोग्य वर्तन/ अयोग्य माध्यमांचा वापर केल्याबददल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुध्द कारवाई :-

उमेवारांना सूचित केले जाते की, त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना कोणतेही खोटे, छेडछाड केलेले किंवा बनावट तपशिल सादर करु नयेत आणि कोणतीही महत्वाची माहिती लपवू नये. परिक्षेच्यावेळी किंवा त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत उमेदवार खालील बाबीत दोषी असल्यास किंवा आढळून आल्यास अशा उमेदवारांविरुध्द फौजदारी खटला भरणे, यासोबतच त्या परिक्षेसाठी अपात्र ठरविणे किंवा त्या उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर सदरची बाब निदर्शनास आल्यास त्याची सेवा समाप्ती करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१.अयोग्य मार्गाचा अवलंब करणे.

२.तोतयागिरी करणे किंवा कोणत्याही व्यक्तिव्दारे तोतयागिरी करुन घेणे.

३.परिक्षा हॉलमध्ये गैरवर्तन करणे किंवा चाचणी सामग्री किंवा त्यातील इतर कोणतीही माहिती कोणत्याही स्वरुपात तोंडी किंवा लेखी, इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिकरित्या कोणत्याही उद्देशाने उघड करणे किंवा प्रकाशित करणे.

४.त्याच्या /तीच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब करणे.

५. अयोग्य मार्गाने त्याच्या किंवा तिच्या उमेदवारीसाठी समर्थन मिळविणे

६.परीक्षा केंद्रामध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरण बाळगणे.

## १९. उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना :-

१) परीक्षा केंद्राचा पत्ता , प्रवेश पत्रावर नमुद करण्यात येईल.
२) परिक्षेचे केंद्र, स्थळ, दिनांक, वेळ बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.
३) परीक्षा प्रवेश पत्रावर नमुद केलेल्या वेळेनंतर,परीक्षा केंद्रवर उपस्थित होणाऱ्या उमेदवारांना परिक्षेला बसू देण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.
४) परिक्षेचा कालावधी जरी १२० मिनीटांचा असेल तरीसुध्दा उमेदवारांना परीक्षा केंद्रावरील विहीत प्रक्रिया (उमेदवारांना महत्वाच्या सुचना देणे,उमेदवाराची व कागदपत्रांची पडताळणी करणे,आवश्यक कागदपत्रे जमा करणे,लॉग इन करणे)

इत्यादी कार्य पार पाडण्यासाठी उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान एक तास परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

५) उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपुर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशिर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्वसूचना/ नोटीस अथवा कारण न देता उमेदवारास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

६) ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील. त्यास विभाग कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

७) उमेदवारास ऑनलाईन अर्ज करताना कोणतीही शंका असल्यास त्याबाबत हेल्पडेस्कशी संपर्क साधता येईल.

## २०. इतर अटी :-

१.उमेदवारांना परिक्षेला उपस्थित असताना, परिक्षेच्या प्रवेश पत्रासह , ओळखपत्राच्या पुराव्याची छायांकित प्रत सादर करावी लागेल. त्याशिवाय त्यांना परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२. परिक्षार्थी उमेदवारांनी लक्षात ठेवावे की, प्रवेश पत्रावर दिसणारे नाव (नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले ) ओळखपत्रावर दिसत असलेल्या नावाशी तंतोतंत जुळले पाहीजे. विवाहा नंतरचे नाव / आडनाव/ मध्यम नाव बदलेल्या महिला उमेदवारांनी याची विशेष नोंद घ्यावी. प्रवेश पत्र आणि ओळखपत्रामध्ये दर्शविलेले नाव यामध्ये साम्य न आढळल्यास उमेदवाराला परिक्षेला बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे. त्यांचे बाबतीत नाव बदलल्याबाबतचा पुरावा सादर केला तरच परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाईल.

३.परिक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये विभागाचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल यासंदर्भात विभागादवारे कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

४. जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र :- उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असेल त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे.

## २१. निवडीचा निकष :-

जाहिरातीत नमुद विविध पदांवरील नियुक्त्या या सदरच्या परिक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे निवड करुन करण्यात येतील. परिक्षेदवारे निवडीसाठी आवश्यक किमान गुण व परिक्षेमध्ये उमेदवारांना समान गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीतील प्राधान्य क्रम शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग. प्रानिम-१२२२/प्र.क्र.५४/का-१३अ, दि.४ मे,२०२२ मधिल तरतूदीनुसार राहील.

## २२. परीक्षा शुल्काचा भरणा:-

१) परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाइन प्रणालीद्ववारे उपलब्ध करुन दिलेल्या पेमेंट गेटवेच्या माध्यमातून UPI, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे करता येईल.

२) परीक्षा शुल्काच्या रक्कमेची भरणा करताना बँक खात्यातून परीक्षा शुल्काच्या रक्कमेची वजावट झाल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरुन लॉग आऊट होऊ नये.

३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्क भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (Status) लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापुर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

४) परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांक / विहित वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकणाऱ्या उमेदवारांचा संबंधित भरती प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

## २३. परीक्षा केंद्राची निवड :-

(१) अर्ज सादर करतानाच परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

(२) केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

(३) एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते केंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या केंद्रावर करण्यात येईल.

(४) एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये अथवा विभागाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

(५) वरीलप्रमाणे केंद्र निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास परिक्षा केंद्र वाटपाबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

## २४. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-

१)नियुक्त झालेल्या उमेदवारास खालील अर्हता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील

२) जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३)हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर उमेदवार अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## २५. प्रवेशप्रमाणपत्र :-

१)परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्र ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेत स्थळावर उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतः चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**३) परीक्षेच्यावेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.**

४) नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह नोंदणी निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियां च्या बाबतीत)नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

## २६. परीक्षेस प्रवेश :-

१) फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत्त अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल .

२)स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तु, इलेक्ट्रॉनिक उपकरणे(पेजर व इत्यादी) वहया,नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator), पेजर इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वतः जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

३) यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस विभाग जबाबदार राहणार नाही.

07-10-24

ठिकाण : पुणे
दिनांक : ऑक्टोबर,२०२४.

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त,समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य,पुणे